

# डावखुरेपणा – वैज्ञानिक तथ्य


**पूर्व पीठिका** : विज्ञान जितके साधर्म्य आणि समानतेने व्यापलेले आहे, तितकेच ते अपवाद आणि वैचित्र्य यांनीही भरलेले आहे. त्यात सुसंगतीसोबत विसंगती तितक्याच प्रकर्षाने आढळते. सृष्टीमध्ये तर याची प्रचिती अनेकदा येते. मानवाचे शरीर हा सृष्टीचा असाच एक अत्यंत व्यामिश्र व काहीसा अनाकलनीय आविष्कार म्हणता येईल. अनेक बाबतीत मानव हा अन्य प्राण्यांपेक्षा वेगळा आहे हे आपण जाणतोच. अगदी कपडे घालणे असो किंवा अत्यंत समृद्ध असे शाब्दिक संज्ञापन करणे, अन्न शिजवणे, गुंतगुंतीची यंत्रे, तंत्रे निर्माण करणे अशा अनेक बाबी त्यात येतात. मात्र याच मनुष्यप्राण्यामध्ये एक असे वैशिष्ट्य आहे की ते त्याचे वैगुण्यदेखील म्हणता येईल, ते म्हणजे त्याला निसर्गाने इतर अनेक प्राण्यांप्रमाणेच दोन हात, दोन पाय, दोन डोळे, दोन कान असे अनेक अवयव दोन–दोन दिलेत पण त्यापैकी एकेकच जास्त कुशल आणि सक्षम असतो, दुसरा त्या मानाने थोडा दुर्बल असतो. त्यातही हाताच्या बाबतीत तर हे खूप तीव्रतेने दिसते. त्यापुढे अजून एक बाब म्हणजे बहुसंख्य माणसे फक्त उजव्याच हाताचा कुशलतेने वापर करू शकतात, त्यांना मराठीत उजखुरे किंवा उजखोरे म्हणतात, आणि काही अल्पसंख्य माणसे फक्त डावाच हात कुशलतेने वापरू शकतात, त्यांना डावखुरे किंवा डावखोरे म्हणतात.

**लोकसंख्या व टक्केवारी** : मनुष्यातील या हातासंबंधीच्या गुणवैशिष्ट्याला हस्तता असे म्हणतात, म्हणजे डावखोरेपणाला वामहस्तता व उजखोरेपणाला दक्षिणहस्तता म्हणतात. गेल्या साठ–सत्तर वर्षात जगभर झालेल्या हस्ततामापनाच्या विविध शास्त्रीय निरीक्षणातून कोणत्याही जनसमुदयामध्ये ८ ते १२% इतक्या व्यक्ति डावखुऱ्या असतात असे आढळून आले आहे. म्हणजेच भारताची लोकसंख्या एक अब्ज पन्नास कोटी गृहीत धरली तर अंदाजे १२ ते १८ कोटी लोक

डावखोरे आहेत, म्हणजेच ही संख्या प्रचंड मोठी असून दुर्लक्षून चालण्यासारखी नाही. ( आकृति ०१ पाहणे)


**मूलभूत प्रश्न** : यामुळे काही प्रश्न उपस्थित होतात, ते म्हणजे मुळात अन्य प्राण्यांच्या तुलनेत मनुष्य एकाच हाताने जास्त चांगले काम का करू शकतो, दोन्ही हातांनी का नाही? आणि त्यातही उजखुऱ्या लोकांचे प्रमाण जास्त का? समसमान का नाही? डावखुरे लोक इतके कमी का? आणि सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे कोणत्याही एका हाताचा कौशल्यपूर्ण वापर ही सवयीने, प्रशिक्षणाने येणारी बाब आहे की नैसर्गिक? की दोन्ही? म्हणजे लहान मुलामुलीला हाताच्या वापराबद्दल जशी लावू तशी सवय लावता येते का? व तसे करणे योग्य आहे का?यातील बहुतेक प्रश्नांची उत्तरे शरीरविज्ञान व मज्ञातंतू विज्ञानामध्ये आहेत, ती संक्षेपाने पाहूया.

आकृति क्र. 01




**वैज्ञानिक पार्श्वभूमी** : बहुतेक पृष्ठवंशीय प्राण्यांप्रमाणेच मानवी शरीराचे दोन सरळ पण प्रतिमास्वरूप भाग पडतात. (ज्यांना आपण डावा व उजवा अशी नावे दिली आहेत, पण सृष्टीत असा भेद नाही), या सोबतच मानवी मेंदूचेही डावा व उजवा अर्धगोल असे दोन समान भाग पडतात. मजा म्हणजे डावा मेंदू शरीराच्या उजव्या भागावर व उजवा मेंदू डाव्या शरीरावर असे नियंत्रण ठेवतात. (आकृति ०२ पाहणे). त्यासाठी जे मज्ञातंतु मेंदूतून शरीराच्या विविध भागांकडे जातात, ते आपल्या मानेच्या मागच्या भागात एकमेकाला ओलांडून पलीकडे जातात. मेंदूच्या या दोन्ही अर्धगोलांची कार्यक्षेत्रे किंवा त्यांच्यामध्ये असणारी नियंत्रण केंद्रेदेखील मुख्यत्वे भिन्न असतात. ती साधारणपणे वरीलप्रमाणे :

आकृति क्र. 02




सृष्टीची यापुढील गंमत म्हणजे बहुतेक निकोप व्यक्तींमध्ये जन्मापासूनच या दोन अर्धगोलांपैकी कोणतातरी एकच दुसऱ्यापेक्षा थोडा जास्त वरचढ किंवा प्रबळ होतो. त्यामुळे त्याच्या अधिपत्याखाली असणारा शरीराचा अर्धा भाग थोडा जास्त शक्तिशाली होतो. म्हणून ती व्यक्ति उजखुरी किंवा डावखुरी होते. मात्र विज्ञानाला अजून हे पूर्णपणे उमगले नाही की बहुसंख्य व्यक्तींचा डावा अर्धगोलच का प्रबळ होतो की ज्यामुळे त्या उजखुऱ्या बनतात आणि फार कमी व्यक्ति का डावखोऱ्या होतात. याचे एक कारण असे सांगतात की इतर प्राण्यांपेक्षा माणसात भाषा बोलता, लिहिता येणे ही एक महत्वाची प्रगती आहे, त्याचे ते एक व्यवच्छेदक लक्षण आहे आणि भाषेचे केंद्र बहुतेकांच्या डाव्या मेंदूत असते, त्यामुळे तो भाग जास्त प्रबळ होतो व पर्यायाने उजवे शरीर प्रबळ बनते. मात्र डावखोऱ्या व्यक्तींमध्येही बहुदा भाषेचे केंद्र डाव्याच मेंदूत असते, तरीही त्यांचा उजवा मेंदू प्रबळ होतो

म्हणून त्यांचे डावे शरीर प्रबळ बनते, हे असे का, यावर जागतिक स्तरावर अविरत संशोधन चालू आहे. काही वैज्ञानिकांच्या मते काही विशिष्ट गुणसूत्रांच्यामुळे काही व्यक्ति डावखुऱ्या होतात, तर काहींच्या मते गर्भावस्थेत काही संप्रेरकांच्या असंतुलनामुळे व्यक्ति डावखुरी बनते. मात्र यातील कोणतेतरी एकच कारण यासाठी कारणीभूत आहे असे आजवर ठामपणे सिद्ध झालेले नाही. एक गोष्ट मात्र निश्चित की माणसाची हस्तता ही नैसर्गिक, जन्मजात व कायमस्वरूपी असते. काही विशिष्ट कारणांमुळे हाताच्या काही थोड्या कामांबाबत माणूस आपला दुर्बल हात पुरेशा कौशल्याने वापरू शकतो, पण त्याची मूळ हस्तता कधीच बदलू शकत नाही. म्हणजे लहानपणच्या सक्तीमुळे, धाकामुळे डावखुरे मूल लिहिणे, जेवणे इ. साठी उजवा हात वापरणे शिकू शकते, किंवा अपघात, आजार, व्यंग आदीमुळे एखाद्या व्यक्तीचा सक्षम हात जायबंदी झाला तर दुसऱ्या हाताने अनेक दैनंदिन कामे बऱ्याच चांगल्याप्रकारे करता येतात, पण त्यासाठी मेंदूला काही आपातकालीन परिस्थितीतील बदल करावे लागतात. परंतु त्या काही कामांशिवाय अन्य कृतींसाठी त्या व्यक्तीची मूळ हस्तता बदलत नाही. हातासोबत बऱ्याच अंशी पायांचेही तसेच आहे, बहुसंख्य उजखोऱ्यांचा उजवा पायदेखील जास्त सक्षम असतो, जसे चेंडू आदिला लाथ मारणे आणि तसेच बहुतेक डावखोऱ्यांचेही असते. हीच बाब डोळे व यांनाही लागू होते.

| मेंदूचा डावा अर्धगोल | मेंदूचा उजवा अर्धगोल |
|---|---|
| भाषिक विचार – वाचा व शब्द आकलन | अशाब्दिक आकलन व विचार |
| तार्किक विचार | भावनिक विचार |
| अनुक्रमिक विचार | एकत्रित विचार |
| विश्लेषणात्मक विचार | संश्लेषणात्मक विचार |
| संख्यात्मक विचार | दृश्यात्मक विचार |
| परिमेय विचार | अंतर्बोधात्मक विचार |
| अमूर्त विचार | मूर्त विचार |

**सर्वसामान्य अनुभव** : शाळेत किंवा महाविद्यालयात आपल्या वर्गात किमान एक–दोन विद्यार्थी डावखोरे असण्याचा अनुभव प्रत्येकाला निश्चितच असतो. त्यातही डावखोऱ्या मुलींपेक्षा मुलांचे प्रमाण अधिक असते, असेही जाणवले असेल. अनेक शिक्षकदेखील डावखुरे असतात, किंवा घरात, नात्यात एखादी व्यक्ति डावखोरी असू शकते. परंतु बहुतेकांना त्याबद्दल पुढे फार काही विशेष विचार किंवा काळजी करण्यासारखे वाटले नसेल. जसे बहुसंख्य लोक उजव्या हाताचा प्रकर्षाने वापर करतात तसे काही लोक डाव्या हाताचा करतात इतकेच, त्यामुळे त्याचे एवढे काय? असेही वाटले असेल. आपण कित्येक खेळाडू डाव्या हाताने खेळतांना पाहतो. मग ते क्रिकेटमध्ये गोलंदाजी, फलंदाजी करणे असेल किंवा टेनिस, बॅडमिंटनची रॅकेट पकडणे असेल, सहसा डावखोरी व्यक्ति लक्ष वेधून घेते, हे नक्की.

**डावखोऱ्या व्यक्तीचा अनुभव** : स्वतः डावखुरे असणाऱ्यांचा याबाबतचा अनुभव नक्कीच थोडा वेगळा व गंभीर असू शकतो. मुख्य म्हणजे लहानपणापासून घरीदारी डाव्या हाताने हे करू नकोस, ते करू नकोस अशा मोठ्यांच्या सूचना ऐकणे, प्रसाद घेतांना डावा हात पुढे केला तर तो उजव्या हातावरच मिळेल अशी सक्ती होणे, घराबाहेर पडताना विशेषतः शुभकार्याला किंवा महत्वाच्या कामाला जाताना उजवा पायच प्रथम बाहेर टाकावा अशी सूचना होणे, डावा हात, डावी बाजू हे अशुभ असतं, असं ऐकणे, अशापासून ते डाव्या हाताने लिहू वा जेवू नये म्हणून डावा हात बांधून ठेवणे, डाव्या हातावर फटके मारणे, चटके देणे, किंवा उजवा हात वापरेपर्यंत उपाशी ठेवणे, अन्य शिक्षा देणे असे अनुभवही त्यांना येतात. यातही मुलींना स्वयंपाक शिकतांना किंवा वाढतांना वगैरे डावा हात वापरल्यास विशेष टोमणे ऐकायला मिळू शकतात, उदा. डावखोरी झालीस तर कुणी लग्न करणार नाही, लग्न झालंच तर डावखोऱ्या सुनेला सासू माहेरी पाठवून

देईल, असे अनेक डावखोरी व्यक्ति या सर्व अनुभवातून पुढे जात जमेल तितके या विरोधी परिस्थितीशी जुळवून घेत असते आणि स्वतःमध्ये शक्य तितक्या आवश्यक सुधारणा (!) करत असते, पण आपण हे का करतोय, किंवा आपल्याला हा सर्व त्रास का होतोय, हे बहुतेक डावखोऱ्या व्यक्तींना आयुष्यभर कळत नाही. सगळे सांगतात म्हणजे आपल्यातच काहीतरी दोष नक्की आहे, हे ते गृहीत धरतात आणि डावखोरेपणा ही आपली चूक मानून कायम अपराधी भावनेत राहतात. एखादी गोष्ट, कृती उजव्या हाताने करायचा आटोकाट प्रयत्न करतात व ती जमली की मोठा विजय मिळाल्यासारखे खुश होतात. मात्र कळत नकळत या सर्वांचा त्या व्यक्तीच्या मानसिकतेवर कायम प्रतिकूल परिणाम होत राहातो.

**प्रचलित अपसमज, अंधश्रद्धा व वस्तुस्थिती** : डाव्या हाताच्या वापराबद्दल व एकंदरीतच शरीराच्या डाव्या बाजुबद्दल समाजात शतकानुशतके अनेक अंधश्रद्धा, अपसमज प्रचलित आहेत आणि गंमत म्हणजे कमीजास्त प्रमाणात ते सर्व जगभर आहेत. ज्या प्रदेशात कर्मकांड, शुभाशुभाच्या कल्पना जास्त आहेत, तिथे ते अधिक आढळतात, अन्य ठिकाणी विशेषतः वैज्ञानिक व तर्कशुद्ध बैठकीवर आधारित समाजात ते त्यामानाने कमी दिसतात. त्यापैकी काही प्रमुख असे आहेत:

१. डावखोरी व्यक्ति मुद्दाम हट्टीपणाने उजवा हात न वापरता डावा हातच वापरते, ती व्यक्ति इतरांना त्रास देण्यासाठी तसे करते.
२. बालकाची हस्तता ही पालक, शिक्षक जसे ठरवतील व वळण लावतील तशी बनु शकते,
३. डाव्या हाताने पूजा करणे धर्माविरुद्ध आहे,
४. डाव्या हाताने प्रसाद घेणे रिवाजाला धरून नाही व अपशकुनी आहे,
५. डाव्या हाताने आदाब, क्रॉस इ. करणे शास्त्रसंमत नाही,
६. रोख पैशाची देवाणघेवाण डाव्या हाताने करू नये, विशेषतः बोहनीच्या वेळी.
७. देवाचा डावा कौल अशुभसूचक किंवा नकारात्मक असतो.
८. डाव्या हाताने आशीर्वाद देऊ नये,
९. डाव्या हाताने जेवणे अस्वच्छ असते, १०. जेवण उजव्याच हाताने वाढावे,
११. नववधुने उजव्या पायानेच माप ओलांडून गृहप्रवेश करावा.
१२. डावा हात फक्त अस्वच्छ कामांसाठी व उजवा चांगल्या कामांसाठी वापरावा.

व असे अनेक (यासारखे अजून वेगळे समज आपल्या भागात, समाजात असतील तर जरूर आम्हाला कळवावेत)

पण या सर्वांकडे जर बारकाईने पहिले तर त्याचा उगम एकाच ठिकाणी दिसतो आणि तो म्हणजे स्वच्छ अस्वच्छतेच्या कल्पना. प्राचीन काळी जेंव्हा व्यक्तिगत स्वच्छतेसाठी मर्यादित साधने उपलब्ध होती, तेंव्हा बहुसंख्य लोक उजखोरे असल्याने जेवण व अन्नासंबंधी सर्व कामे उजव्या हाताने केली जावीत आणि मलविसर्जनानंतर अंग स्वच्छ करण्यासारखी अस्वच्छ कामे डाव्या हाताने करावीत असा दंडक पडला. हळूहळू त्याचे रूपांतर उजवा म्हणजे स्वच्छ, शुद्ध म्हणूनच शुभ आणि त्याउलट डावा म्हणजेच अस्वच्छ, अशुद्ध म्हणजेच अशुभ अशा गैरसमजात आणि पुढे अंधश्रद्धेत झाले. मात्र मुळात अल्पसंख्य असलेल्या डावखोऱ्या लोकांना या सर्वांच्या सक्तीमधून नाहक जावे लागले, त्यांना काय सोयीचे आहे, हे कुणीच लक्षात घेतले नाही, कारण एकतर डावखोरेपणा नैसर्गिक आहे हेच कुणाला माहिती नव्हते, दुसरे म्हणजे कर्मकांडाच्या पगड्याने समाज बुरसटलेला होता व तिसरे म्हणजे संख्याबळ नसल्याने याबद्दल कुणी आवाज उठवू शकत नव्हते. त्यातच अशी सक्ती अगदी बालवयात केली जात असल्याने

त्या वयात कसलाही विरोध करणे शक्य नसते व पुढे तेच अंगवळणी पडते, योग्य वाटू लागते.

आज जग खूप सुधारलेले आहे, वैज्ञानिक दृष्टिकोन आजच्या जीवनाचा पाया आहे व स्वच्छतेची साधने व संकल्पना खूप बदललेल्या आहेत, मात्र अजूनही आपण अपसमज, अंधश्रद्धा व अज्ञाताच्या भीतीने अन्य अनेक गोष्टींसारखाच डाव्या हाताच्या वापराबद्दलचा आकस मनातून घालवू शकलो नाही. वर नमूद केलेले व असे इतर किती अपसमज अजून व्यवहारात आहेत, आपण स्वतः उजवा तो योग्य व डावा म्हणजे अयोग्य असे मानतो की नाही हे प्रत्येकाने जरूर ताडून पहावे.

**डावखोऱ्या व्यक्तींना येणाऱ्या अडचणी / समस्या:**

**१. सामाजिक सक्ती** : आजही लहान मुलांना जेवणे व लिहिणे शिकवतांना प्रथम उजवाच हात वापरायला सांगितला जातो. मग ते बोटांनी भाकरी, चपाती तोडणे व घास बनवणे असो, चमचा पकडणे असो की पेन्सिल पकडणे असो. जर मुलाने (म्हणजे मुलगा, मुलगी कुणीही) ते व्यवस्थित ऐकले व केले तर उत्तमच पण जर त्याऐवजी डावाच हात वापरला किंवा नुसता पुढे जरी केला तरी त्यावर चापट मारून हा नाही तो असे बहुसंख्यवेळा सांगितले जाते. पालकांना हस्ततेबद्दल माहिती असेल तर ते तसे करणार नाहीत, पण नसेल तर ते वारंवार त्याला तसे सांगत राहतील. पुढेपुढे थोडी जास्त सक्ती, रागावणे व मग शिक्षा, असेही होऊ शकते. मूल मूळ डावखोरे असले– नसले तरीही त्याला नैसर्गिकरीत्या डावा हात काही कामांना वापरणे सुलभ वाटू शकते, (उदा. सचिन तेंडुलकर खेळतो उजव्या हाताने व लिहितो डाव्या हाताने) पण त्या बालकाला तसे करू दिले जात नाही. अशावेळी मूल त्रासून कंटाळून उजवा हात वापरू लागते, पण डावखोऱ्या मुलाला ते खूप कठीण जाते व त्याचा असह्य ताण येऊ शकतो, त्यातूनच जेवण, लेखन या कृती व त्याबद्दल सक्ती करणारी व्यक्ति या सर्वांचाच तिरस्कार वाटू शकतो. पुढे याचे कायकाय मानसिक दुष्परिणाम होऊ शकतील हे आपण सहजच समजू शकतो.

**२. प्रात्यक्षिक समस्या** : सामाजिक सक्तीसोबत डावखोऱ्या व्यक्तीला अनेक दैनंदिन अडचणींना व प्रात्यक्षिक समस्यांना सामोरे जावे लागते. आधुनिक जग हे बहुसंख्यांसाठी बनवलेले आहे. त्यामुळे लहानमोठी यंत्रे, वाहने, उपकरणे, अवजारे, शस्त्रे व हत्यारे आदि सर्व मुख्यत्वेकरून उजव्या हाताने वापराच्या सोयीची बनवलेली असतात. (आकृति ०३ अ ते ई पाहणे). यात पेन्सिलीचे टोक काढण्याच्या यंत्रापासून ते कात्री, मोजपात्र, वर्नीअर कॅलिपर, मायक्रोमिटर स्क्रू गेज, यंत्रशाळेतील अवजारे उदा. लेथ, ड्रिल यंत्र, एकाच बाजूला (उजव्या ) लेखनासाठी फळी असलेल्या खुर्च्या, दंतवैद्यकीय व वैद्यकीय चिकित्सेची सामुग्री, बंदुका, अवजड तोफा आदि शस्त्रास्त्रे, विमानातील नियंत्रण यंत्रणा आणि अशा अगणित गोष्टींचा समावेश होतो. डावखु व्यक्ति अगदी लहानपणापासून यातील एकेका गोष्टीची सवय करून घेत असते, परंतु त्यामध्ये अनेकदा चुका होतात, अपघात होतात, वेळ जास्त लागतो, अंगदुखी, स्नायूपीडा होऊ शकते, काम अचूक होत नाही, त्यामुळे परीक्षेत गुण कमी मिळू शकतात, कामाच्या जागी समस्या येतात, मानसिक संतुलन बिघडू शकते. हे सर्व आपण आजूबाजूच्या एखाद्या

*आकृति क्र. 03 अ*



डावखोऱ्या विद्यार्थाचे, व्यक्तीचे निरीक्षण करून सहज पाहू शकतो. (आपल्या पाहण्यात अशी अजून काही वेगळी उदाहरणे असतील तर जरूर कळवावीत.)

*आकृति क्र. 03 आ*



मोजपात्र

*आकृति क्र. 03 इ*



मायक्रोमिटर स्क्रू

*आकृति क्र. 03 ई*




वर्नीअर कॅलिपर

**३. लेखन समस्या :** प्रात्यक्षिक समस्यांपेक्षा अधिक विचित्र गोष्ट जर सांगितली तर कदाचित कुणाचाच त्यावर विश्वास बसणार नाही पण ती आहे भाषालेखन. जगातल्या बहुसंख्य भाषा या डावीकडून उजवीकडे लिहिल्या जातात. म्हणजे असे वाटते की इथे डाव्या बाजूला प्राधान्य दिले आहे, पण ते तसे नाही. उजव्या हाताने लिहिताना डाव्या बाजूने सुरुवात केली की हाताच्या सर्व सांध्यांची हालचाल अगदी सहजतेने व नैसर्गिक होते. हात शरीराच्या जवळून हळूहळू उलगडत दूर जातो. बोटांचे कामही योग्य होते, म्हणजे अंगठा पेन-पेन्सिलला आधाराचे आणि पुढे ढकलण्याचे काम करतो व तर्जनी आणि मधले बोट त्याला वळवून अक्षरनिर्मितीचे काम करतात. लिहिताना आधीचे लिहिलेले समोर दिसत जाते आणि बराच वेळ न उचलतादेखील हात व ओळ सरळ रेषेत पुढेपुढे जातात. याउलट डाव्या हाताने लिहिताना हात आधी शरीरापासून दूर असतो व हळूहळू तो शरीराजवळ येऊ लागतो, यात हाताच्या सर्व सांध्यांची हालचाल अनैसर्गिक व अवघड होते, हात वारंवार उचलावा लागू शकतो, तसेच बोटांची हालचाल विचित्र होते, अंगठ्याला फारसे काम राहात नाही, पेन-पेन्सिलला आधाराचे आणि पुढे ढकलण्याचे तसेच त्याला वळवून अक्षरनिर्मितीचे काम अशी सर्व कामे तर्जनी आणि मधले बोट यांनाच करावी लागतात. त्यासोबतच आधी लिहिलेल्या शब्दांवरून हात पुढे जातो, त्यामुळे ते दिसेनासे होतात, लेखन पुसले जाऊ शकते, हात मळू शकतो. लिहिण्याची दिशा चुकून तिरकी होऊ शकते. मुळात सर्व अक्षरांचे वळण उजव्या हाताने लिहिण्याच्या सोयीचे असते. ज्या भाषा उजवीकडून डावीकडे लिहिल्या जातात (उदा. उर्दू, अरबी, फारसी, हिब्रू ), त्यांच्या लिपींची रचनाही उजव्या हाताच्या सोयीचीच असते, असे तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. तिथे डावखोऱ्या व्यक्तीला येणाऱ्या अडचणींबद्दल अनुभवी व्यक्तींनी जरूर कळवावे. लेखनाची सुरुवात शरीरापासून दूर झाल्याने वही, कागद किंवा उत्तरपत्रिका जास्त तिरके ठेवावे लागतात. ( आकृति ०४ पाहणे). ज्यामुळे हालचाल सुलभ होते, लिहिलेले दिसू शकते आणि वेगही चांगला होतो. परंतु इतरांना ते विचित्र व चुकीचे वाटते, परीक्षेत तर ते आक्षेपार्हही वाटू शकते. वर्गात बाकावर डाव्या बाजूला उजखुरा व उजव्या बाजूला डावखुरा विद्यार्थी बसत असतील, तर त्यांचे कोपर एकमेकाला धडकते व दोघांनाही लिहिण्यात अडचण येते. वरील सर्व उदाहरणांमध्ये नीट निरीक्षण केले तर एक गोष्ट लक्षात येईल ती म्हणजे यात डावखोऱ्या व्यक्तीचा

काहीही दोष नसताना अपसमज, अंधश्रद्धा, रचनात्मक गैरसोय किंवा जाचक नियम यांचे विविध दुष्परिणाम त्यांना विनाकारण भोगावे लागतात. यातले काही तात्पुरते व गौण असतीलही पण बहुतेक दूरगामी व तीव्र स्वरूपाचे आहेत, हे निश्चितच.

*आकृति क्र. 04*




**लेखन**

**डावखोरेपणाचे फायदे** : वरील सर्व पार्श्वभूमीवर डावखोरी व्यक्ति आयुष्यभर अनंत अडचणींना सामोरी जात असते व त्यातूनच आपली प्रगती करण्याचा प्रयत्न करत असते, हे अधोरेखित होतेच, तरीही या काळ्या ढगाला एक सोनेरी किनारदेखील आहे. अशी काही क्षेत्रे आहेत जिथे डावखोरेपणाचा फायदा होऊ शकतो. यात प्रथम येते ते म्हणजे क्रीडाक्षेत्र. असे अनेक खेळ आहेत ज्यात डाव्या हाताच्या अधिक किंवा मुख्य वापरामुळे प्रतिस्पर्ध्याला अडचणीत टाका येऊ शकते, जसे टेनिस, बॅडमिंटन, टेबलटेनिस, स्क्रॉशसारखे रॅकेट खेळ, मुष्टियुद्ध, जुदो, कराटे, कुस्ती, तलवारबाजीसारखे खेळ आणि अर्थात क्रिकेट. या सर्वांमध्ये प्रतिस्पर्ध्याला डावखोऱ्या स्पर्धकाबरोबर खेळण्याचा जास्त अनुभव नसतो. त्यामुळे त्याचा गोंधळ उडू शकतो व त्याचा लाभ डावखोऱ्या खेळाडूला नक्कीच होतो. कबड्डी, खोखो, आट्यापाट्या, फुटबॉल, आईस हॉकी, नौकानयन अशा खेळांमध्येही डाव्या बाजूने चाल करणे, पकड करणे, आक्रमण करणे, वल्ही मारणे अशा कामांसाठी विशेषकरून डावखोऱ्या खेळाडूचा निश्चित उपयोग करता येतो. क्रिकेटमध्ये डावखोऱ्या खेळाडूंचे महत्व किती अनन्यसाधारण आहे हे सर्वांना माहिती असेलच. (हॉकी या भारताच्या राष्ट्रीय खेळात मात्र अजूनही हॉकी स्टिक फक्त उजव्या बाजूनेच वापरण्याचा नियम असल्याने तो डावखोऱ्याना नक्कीच जाचक आहे.) यासोबतच सांघिक किंवा जोडीने करण्याच्या अनेक व्यावसायिक व जोखमीच्या कामांमध्ये एकजण डावखोरा असणे अत्यंत लाभकारी होते, उदा. सुतारकाम, गवंडीकाम, अवजड यंत्रांचा वापर, सांघिक रॅपलिंग इ. तसेच सैन्यामध्ये नेहमी दोन सैनिकांची जोडी बनवतात, त्यांना 'Bddy (बडी)' म्हणजे जिवलग मित्र म्हणतात. प्रत्येक मोहिमेत कार्यात ते कायम एकत्र असतात. कित्येक जोखमीच्या कामी त्यातला एक डावखुरा असणे अनेकदा जीवनरक्षक ठरू शकते.

**अपेक्षित कृती कार्यक्रम:**

मुलांच्या जडणघडणीसाठी जबाबदार असणाऱ्या शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, शैक्षणिक धोरण नियोजक, मानसशास्त्रज्ञ, क्रीडातज्ज्ञ व पालक तसेच व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या सर्व वस्तु, अवजारे, आयुधे, आदींचे निर्माते अशा सर्व घटकांनी या विषयाचा साकल्याने विचार व अभ्यास करून त्याप्रमाणे काही विशेष निर्णय घेऊन, त्यानुसार नियोजन करून त्याची त्वरित काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

कृपया याविषयी पुढील प्रश्नावली भरून आम्हाला जरूर पाठवावी. गरज भासल्यास वेगळे लिहून पाठवावे.

◆

**बिपिनचंद्र चौगुले, पुणे**
(संस्थापक अध्यक्ष असोसिएशन ऑफ लेफ्टहँडर्स)
ईमेल : alhpune@gmail.com
मोबा. +९१-९८२२५२२१३४.

## प्रश्नावली

अ) आपल्या भागात डावखोरेपणाबद्दल काही समज, अपसमज, अंधश्रद्धा इ. आहेत का? असल्यास कोणते? थोडक्यात सांगावे. ____________________

____________________

(आ) डावखोऱ्या व्यक्तीला काही कामांसाठी उजवा हात वापरण्यास सांगितले जाते का? असल्यास कोणत्या कामांसाठी? थोडक्यात सांगावे. ____________________

____________________

इ) डावखोऱ्या व्यक्तीसंबंधी तुमची काही विशिष्ट निरीक्षणे आहेत का? असल्यास काय? थोडक्यात सांगावे. ____________________

____________________

ई) या संदर्भात आपले अजून काही विचार, शंका, प्रश्न व टिप्पणी असेल तर ती थोडक्यात लिहावी.

____________________

____________________


**समृद्धीसाठी शाश्वत तंत्रज्ञान!**

**डॉ. बावसकर टेक्नॉलॉजी (ॲग्रो) प्रा. लि.**

**जर्मिनेटर, थ्राईवर, क्रॉपशाईनर, राईपनर, प्रोटेक्टंट-पी, प्रिझम, न्युट्राटोन, कॉटन थ्राईवर, हार्मोनी, पॅडी थ्राईवर, कल्पतरू (सेंद्रिय खत), सिद्धीविनायक मोरिंगा शेवगा, बॅटरी स्प्रेपंप**

DR. BAWASAKAR TECHNOLOGY (AGRO) PVT. LTD. ®

आधुनिक कृषी तंत्रज्ञानाने सर्वांगीण विकास घडविणारे

**'कृषी विज्ञान' मासिक**

**वार्षिक वर्गणी रु. ३००/-**

ॲग्रोटेक पब्लिकेशन ®

**आपली कृषी विज्ञान केंद्रे**

**मुख्य कार्यालय : १६, कृषी उद्योग भवन नं. १, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे- ४११०३७.**

**☎ (०२०) २४२६१४९४ / २४२६०८९५ / ९९७५३०१३९५**

☎ जळगाव : (०२५७) २२३४४७७, ☎ कोल्हापूर : (०२३१) २६५११७६, ☎ नारायणगाव : (०२१३२) २४४७०१ / ९९२२३४५५९४

☎ नाशिक : (०२५३) २६२०४५० / ९८६००७२५४३, ☎ सटाणा (नाशिक) : (०२५५५) २२३९३३ / ९६०४३४५७१२

● www.drbawasakar.com ● E-mail : info@drbawasakar.com ● Fb : Dr.BawasakarTechnologyAgroTech